क्रमांक: एलईएन. १०९२/प्र.क्र. ६५/ ज-१,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२.

दिनांक १०.१२.१९९८

प्रति,

सर्व आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी/ सर्व तहसिलदार

22 DEC 1998

विषय:- शेतीसाठी केलेली अतिक्रमणे

शासकीय पड/ गायरान जमिनीवरील शेतीसाठी झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत..

संदर्भ:- १. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन. १०९०/ प्र.क्र. १७२/ज-१, दिनांक २८.११.१९९१

२. शासन परिपत्रक, क्रमांक एलईएन. १०९२/प्र.क्र. ६५/ज-१, दिनांक २२.४.१९९२.

संदर्भाधीन दिनांक २८.११.१९९१ च्या शासन निर्णयाप्रमाणे शासकीय पड व गायरान जमिनीवरील दिनांक १.४.१९७८ ते १४.३.१९९० या कालावधीतील शेतीसाठी केलेली अतिक्रमणे दिनांक २८.११.१९९१ च्या शासन निर्णयातील व दिनांक २२.४.१९९२ च्या परिपत्रकातील अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या अतिक्रमणदारांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबतच्या शासनाने दिलेल्या सुचनांनुसार दिनांक ३१.३.१९९२ पर्यन्त नियमानुकूल करण्याचे आदेश होते. तथापि, अजून प्रत्येक जिल्ह्यामध्ये बरीच प्रकरणे प्रलंबीत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे.

२. शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार सदर कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करावयाची होती. मात्र त्यानंतरही ६ वर्षाचा कालावधी उलटूनही अशी प्रकरणे प्रलंबीत किंवा अनिर्णित ठेवण्यामध्ये अक्षम्य विलंब झालेला आहे, हे स्पष्ट होते. तेव्हा याबाबत आता पुन्हा आदेश देण्यात येत आहेत की, शासकीय पड व गायरान जमिनीवरील शेतीसाठी केलेली अतिक्रमणदारांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची विनंती/ मागणी असल्यास, अशा प्रत्येक प्रकरणामध्ये तहसिलदारांनी निःपक्षपाती चौकशी करून अतिक्रमणदार हा वरील आदेशातील अटी व शर्ती पूर्ण करीत असल्यास, तसेच सदरची जमीन दिनांक १४.४.१९९० रोजी व त्यानंतरही प्रत्यक्ष कशीत असल्याचे सिध्द झाल्यास, अशी अतिक्रमणे नियमानुकूल करण्या-बाबतची कार्यवाही तीन महिन्याच्या आत पूर्ण करावी. मात्र शासनाच्या धोरणानुसार अपात्र ठरणाऱ्या तसेच अतिक्रमणदाराने जमीन प्रत्यक्षात न कसता केवळ सरकारी जमीन हडप करण्याच्या उद्देशाने अतिक्रमण केल्याचे आढळून आल्यास, उक्त अतिक्रमणे तात्काळ काढून टाकण्याची कार्यवाही वरील मुदतीत पूर्ण केली जाईल याची दक्षता घ्यावी.

[ ज.का. घरत ]
अवर सचिव,
महसूल व वन विभाग.

Scanned by CamScanner